THANE POLICE COMMISSIONERATE

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,
ठाणे शहर पोलीस

प्रेसनोट

खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे कडुन अवैधरित्या बेकायदेशीरपणे गावठी दारु तयार करण्याची हातभटटी उध्दवस्त करुन एक इसमास ताब्यात घेतले बाबत.

———————oooooo———————

दिनांक ०३/०७/२०२५ रोजी खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर पथकास गुप्त बातमीदाराकरवी माहीती मिळाली की, " इसम आदेश पंडीत गायकर, रा. सत्संग भवनाचे शेजारी, मलंगगड रोड, व्दारली पाडा, ता. अंबरनाथ, जि. ठाणे. हा व्दारली पाडा ता. अंबरनाथ जि ठाणे हा अवैधरित्या बेकायदेशीरपणे गावठी हातभटटीचे दारूची निर्मीती करीत आहे." मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने दिनांक ०३/०७/२०२५ रोजी १३.१५ वा. जय गोलोबा चाळ समोर, मोकळया मैदानात, व्दारली पाडा, ता. अंबरनाथ जि. ठाणे याठिकाणी पोलीस पथकाने छापा कारवाई करून इसम नामे आदेश पंडीत गायकर, वय २४ वर्षे, धदा – दारू निर्मिती रा. स्वत:चे घर, सत्संग भवनाचे शेजारी, मलंगगड रोड, व्दारली पाडा, ता. अंबरनाथ, जि. ठाणे हा अवैधरित्या बेकायदेशीरपणे गावठी हातभटटीचे दारूची निर्मीती करण्यासाठी लागणारे साहीत्यासह हातभटटी लावून हातभटटीवर गावठी दारु तयार करीत असतांना ३,१५,९५०/– रू. किमंतीच्या गावठी दारू व साहित्यासह मिळुन आल्याने त्याचेविरूध्द हिललाईन पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नंबर ४२८/२०२५ महाराष्ट्र प्रोव्हिबिशन १९४९ कलम ६५ (ब), ६५ (क), ६५ (ई), ६५ (फ) प्रमाणे गुन्हा दिनांक ०३/०७/२०२५ रोजी दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे शहर, मा. डॉ. पंजाबराव उगले, अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे), ठाणे शहर मा. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), ठाणे, मा. शेखर बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, शोध १, गुन्हे शाखा, ठाणे तथा प्रभारी अधिकारी खंडणी विरोधी पथक मा. विनायक घोरपडे, सहायक पोलीस आयुक्त, शोध –२, गुन्हे शाखा, ठाणे, यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/सुनिल तारमळे, सपोनि/कृष्णा गोरे, सपोपि/भुषण कापडणीस, पोउपनिरी/सुहास तावडे, सपोउपनिरी/संदीप भोसले, पोहवा/४०४४ ठाकुर, पोहवा/१०१५ पाटील, पोहवा/शिंदे पोहवा/१५१० गायकवाड, पोहवा/२७० जाधव, पोहवा/१४१६ गडगे, पोहवा/४१८४ राठोड, पोहवा/१८ कानडे, मपोहवा/४४६६ पावसकर, मपोहवा/६७२२ कांबरी, पोना/१९२५ हासे, पोना/७०७९ मधाळे, चापोना/७३१२ हिवरे, पोशि/३२१३ वायकर, पोशि/८२४६ ढाकणे, पोशि/२६४० पाटील, पोशि/१९८४ शेजवळ, मपोशि/८१०१ भोसले यानी केली आहे.